# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ९
## सभावृत्तांत

दिनांक :- ०६/०३/२०१८ वेळ :- दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०६/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.राजेंद्र तानाजी गावडे - अध्यक्ष
२. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
३. मा.करुणा शेखर चिंचवडे
४. मा.सुरेश शिवाजी भोईर
५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
६. मा.विनोद जयवंत नढे
७. मा.निता विलास पाडाळे
८. मा.उषा दिलीप काळे
९. मा.संतोष अंकुश कोकणे

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.देवण्णा गट्टुवार – कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.रामदास तांबे - कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एकनाथ पाटील – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.एच.पी.बन्सल – उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.एन.अहिरे – उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.व्ही.बी.माने – उपअभियंता, नगररचना व विकास विभाग, मा.के.डी.दरवडे – सहा.आरोग्याधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय, इत्यादी.

सर्वप्रथम मा.सुरेश शिवाजी भोईर यांनी पुढील प्रमाणे सुचना मांडली.

आज दिनांक ६/३/२०१८ रोजीच्या मा.प्रभाग समितीस मा.अध्यक्ष ब प्रभाग समिती हे काही कारणास्तव बैठकीस अनुपस्थित असल्याने आज दिनांक ६/३/२०१८ रोजीच्या मा.प्रभाग समिती सभाध्यक्षस्थान मा.राजेंद्र तानाजी गावडे यांनी स्विकारावे.

सदर सुचनेस मा.अश्विनी गजानन चिंचवडे – पाटील यांनी अनुमोदन दिले.

त्याप्रमाणे मा.राजेंद्र तानाजी गावडे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मागील कार्यपत्रिका क्रमांक ७, दिनांक ६/२/२०१८ व दिनांक १४/२/२०१८ तसेच कार्यपत्रिका क्रमांक ८, दिनांक १४/२/२०१८ रोजीच्या विशेष सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.सन्मा.सदस्य व मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढे नमुद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक ५ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयास पुरंदर क्षेत्रीय कार्यालय असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.राजेंद्र तानाजी गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ६ कुणाल इस्टेट ते गोयल गरिमा या रस्त्याला भोईर परिवाराची जागा रस्त्यासाठी गेली असल्याने तेथील भोईर परिवाराची व नागरीकांची मागणी असल्यामुळे तेथील चौकास भोईर चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ७ चौकांचे व कॉलन्यांचे नांव देणेबाबत विचार करणे मा.निता विलास पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ८ प्रभाग क्रमांक १६ येथील पेव्हिंग ब्लॉकची कामे करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रज्ञा महेश खानोलकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ९ काळेवाडी बीआरटीएस मधील बसस्थानकाला नांवे देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.संतोष अंकुश कोकणे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १० नामफलक बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ११ नामफलक बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता विलास पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १२ नामफलक बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.निता विलास पाडाळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १३ चिंचवडगांव येथील तलाठी कार्यालयाच्या जागेत पार्टीशियन करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत मा.राजेंद्र तानाजी गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक १४ वाल्हेकरवाडी येथे सुसज्ज बस थांबा बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.करुणा शेखर चिंचवडे यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ३०
दिनांक ०६/०३/२०१८
सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

विषय क्र. १
विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.राजेंद्र तानाजी गावडे

संदर्भ :- मा.सुरेश शिवाजी भोईर यांचा दिनांक ५/२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मोरया गोसावी क्रिडा संकुलच्या समोरील जाणारा तालेरा हॉस्पीटल रोड या रस्त्याला नांव देण्यात यावे. सदर जागा गावडे परिवाराची रस्त्यासाठी देण्यात आलेली आहे. सदरच्या रस्त्याला अदयाप कोणतेही नामकरण केलेले नसून सदर रस्त्यास कै.शंकरराव मारुती गावडे मार्ग असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३१
दिनांक ०६/०३/२०१८
सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

विषय क्र. २
विभाग - वाचनालय ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा दि.०६/२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

क्रांतीवीर चापेकर बंधू यांचे जन्मस्थान क्रांतीतीर्थ चापेकरवाडा येथे दैनंदिन देशप्रेमी व इतिहासप्रेमी नागरीकांची वर्दळ असते. त्यामुळे क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीने सार्वजनिक वाचनालयाकरीता वृत्तपत्रे मागण्याची विनंती पत्राव्दारे केली आहे.

याठिकाणी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक वाचनालय प्रकल्पातून वृत्तपत्रे दयावीत, तसेच केशवनगर येथील पु.ल. देशपांडे वाचनालय व रस्टन कॉलनी आणि नवतरुण मंडळ चिंचवडगांव येथे सर्व ठिकाणी सर्व वृत्तपत्रे देण्यात यावी असा विषय मा.प्रभाग समितीपुढे आला असता सदर विषयांस मा.निता विलास पाडाळे यांनी पुढे नमुद केलेप्राणे सुचना मांडली

ब क्षेत्रीय कार्यालयाच्या सर्व प्रभागांमध्ये सार्वजनिक वाचनालयांना वृत्तपत्रे देण्यात यावीत.

सदर सुचनेस मा.अश्विनी गजानन चिंचवडे पाटील यांनी अनुमोदन दिले. सबब सदरचा विषय उपसुचनेसह प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३२
दिनांक ०६/०३/२०१८
सुचक : मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

विषय क्र. ३
विभाग - विदयुत /स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा दि.०६/२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड मोरया हॉस्पीटल समोरील व्यापारी संकुलाच्या दुस-या मजल्यावर आर्ट गॅलरी व अत्याधुनिक ए/सी हॉल तयार करणेबाबत तत्कालीन आयुक्त श्री राजीव जाधव यांनी पाहणी करुन तत्वता मान्यता दिली होती. परंतु बांधकाम अपूर्ण असल्यामुळे हा प्रस्ताव बारगळला.

इमारतीमध्ये दोन मोठे हॉल बांधलेले असून, याठिकाणी आर्ट गॅलरी ए/सी हॉल निर्माण करण्यात यावेत अशी मागणी कलाकार व या भागातील नागरीकांची आहे. सांस्कृतिक व कलाक्षेत्रातील मान्यवर या परिसरामध्ये राहतात.

तरी मोरया हॉस्पिटल समोरील व्यापारी संकुलाच्या दुस-या मजल्यावर सर्व सोयी सुविधा युक्त आर्ट गॅलरी व अत्याधुनिक बहुउददेशीय ए/सी हॉल तयार करण्यात करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३३
दिनांक ०६/०३/२०१८
सुचक : मा.प्रज्ञा महेश खानोलकर

विषय क्र. ४
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.प्रज्ञा महेश खानोलकर यांचा दि.१४/२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ ब किवळे येथे १) कै.बाळकृष्ण मारुती येळवंडे चौक, मामुर्डी २) हनुमान कॉलनी, आदर्शनगर मामुर्डी ३) कै.महादेव लक्ष्मण भोंडवे चौक, रावेत (पोलीस पाटील) ४) भगवान गोगादेव चौक, दत्तनगर असे नामफलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३४
दिनांक ०६/०३/२०१८
सुचक : मा.राजेंद्र तानाजी गावडे

विषय क्र. ५
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.राजेंद्र तानाजी गावडे यांचा दि.६/३/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयास पुरंदर क्षेत्रीय कार्यालय असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

विषय कायम होणेची वाट न पहाता तात्काळ कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३५
दिनांक ०६/०३/२०१८
सुचक : मा.सुरेश शिवाजी भोईर

विषय क्र. ६
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

संदर्भ :- मा.सुरेश शिवाजी भोईर यांचा दि.२८/२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

कुणाल इस्टेट ते गोयल गरिमा या रस्त्याला भोईर परिवाराची जागा रस्त्यासाठी गेली असल्याने तेथील भोईर परिवाराची व नागरीकांची मागणी असल्यामुळे तेथील चौकास भोईर चौक असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३६
दिनांक ०६/०३/२०१८
सुचक : मा.निता विलास पाडाळे

विषय क्र. ७
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.विनोद जयवंत नढे

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दि.०६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

सर्व्हे नं.८३ मधील काळेवाडी स्मशानभुमी लगतचा रोड ते बीआरटी रोडला कै.सोपान शंकर नढे मार्ग व सर्व्हे नं.८३ मधील बीआरटी ते आदर्श चौकाकडे जाणारे रोडला कै.बबन उर्फ दादा देवराम केमसे मार्ग असे नांव देणेस तसेच कै.नथु नढे कॉर्नर (काळेवाडी बीआरटी रोड) असे नांवे देणेस तसेच काळेवाडीतील विजयनगर येथील बहुतेक कॉलन्यांचे बोर्ड नसल्यामुळे नागरीकांना गैरसोय होत असून, येणा-या नागरीकांच्या सोयीसाठी सर्व कॉलन्यांना पालिकेचे बोर्ड लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३७
दिनांक ०६/०३/२०१८

विषय क्र. ८
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.प्रज्ञा महेश खानोलकर

अनुमोदक: मा.निता विलास पाडाळे

संदर्भ :- मा.प्रज्ञा महेश खानोलकर यांचा दि.०६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १६ येथील पुढे नमुद केलेप्रमाणे १) नेसामनी – दिपा स्टोअरजवळ, विकासनगर, २) नितीन जाधव – हनुमान कॉलनी, विकासनगर, ३) पी.पी.डेव्हिस – सेंटमेरी चर्च, विकासनगर ४) व्ही.के.तिवारी – देवी हाईटस, विकासनगर ५) सुबलक्ष्मी पिल्ले – काळुबाई मंदिर, पीसीएमसी मराठी शाळेजवळ समर्थ कॉलनी ६) धुमाळ – स्वर्गलाभच्या समोर, विकासनगर ७) दारवटकर – श्री कॉलनी, ८) विष्णू लोहकरे – बापदेवनगर, ९) शेख रहिम – सुमन अपा, विकासनगर, १०) रोहित सरनोबत – दत्तनगर, ११) वानखेडे हॉस्पिटलजवळ – वानखेडे, विकासनगर १२) कैलास कन्हेरे – शुभश्री जवळ, विकासनगर, १३) नेटके वस्ती – किवळे गावठाण १४) दत्त मंदिर – भारतरत्न सोसायटी १५) मराठे – समर्थ कॉलनी विकासनगर याठिकाणी स्थापत्य विषयक पेव्हिंग ब्लॉकची कामे करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३८
दिनांक ०६/०३/२०१८

विषय क्र. ९
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.संतोष अंकुश कोकणे

अनुमोदक: मा.उषा दिलीप काळे

संदर्भ :- मा.संतोष अंकुश कोकणे यांचा दि.०६/०२/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

नव्याने सुरु होत असलेल्या एम.एम. शाळा ते काळेवाडी येथील बी.आर.टी.एस. मधील कोटेश्वर पेट्रोल पंपामागील बसस्थानकाला स्व.ह.भ.प.कुशाबा बाबुराव काळे त्याचप्रमाणे अल्फोन्सा स्कुल मागील बस स्थानकाला स्व.ह.भ.प.रघुनाथ विष्णु नखाते असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता योग्य ती कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३९
दिनांक ०६/०३/२०१८

विषय क्र. १०
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.सुरेश शिवाजी भोईर

अनुमोदक: मा.राजेंद्र तानाजी गावडे

संदर्भ :- मा.सुरेश शिवाजी भोईर यांचा दि.०६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

श्री.मधुकर बहिरु बच्चे यांची महाराष्ट्र विदयुत नियंत्रण समिती सदस्य पदी निवड झालेली आहे. तरी मधुकर बहिरु बच्चे सदस्य, महाराष्ट्र विदयुत नियंत्रण समिती , ए/१, काकडे टॉऊशिप केशवनगर, चिंचवड, संपर्क ९१४६८९५१०० असे नावाचा व पत्त्याचा नामफलक लवकरात लवकर बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४०
विषय क्र. ११
दिनांक ०६/०३/२०१८
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.निता विलास पाडाळे
अनुमोदक: मा.विनोद जयवंत नढे

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दि.०६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

श्री.प्रमोद रघुनाथ ताम्हणकर, यांची अन्नधान्य वितरण दक्षता कमिटीवर सदस्य पदी निवड झालेली आहे. तरी मा.श्री.प्रमोद रघुनाथ ताम्हणकर, मा.नगरसेवक, सदस्य - अन्नधान्य वितरण दक्षता कमिटी यांचे निवासस्थानाकडे परिमंडल अ (चिंचवड विभाग) असे नामफलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. (दोन फलक)

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४१
विषय क्र. १२
दिनांक ०६/०३/२०१८
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.निता विलास पाडाळे
अनुमोदक: मा.विनोद जयवंत नढे

संदर्भ :- मा.निता विलास पाडाळे यांचा दि.०६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

सौ.छायाताई नितीन पाटील यांची अन्नधान्य वितरण दक्षता कमिटीवर सदस्य पदी निवड झालेली आहे. तरी मा.सौ.छायाताई नितीन पाटील सदस्य - अन्नधान्य वितरण दक्षता कमिटी यांचे निवासस्थानाकडे परिमंडल अ (चिंचवड विभाग) असे नामफलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. (दोन फलक)

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४२
विषय क्र. १३
दिनांक ०६/०३/२०१८
विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.राजेंद्र तानाजी गावडे
अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.राजेंद्र तानाजी गावडे यांचा दि.०६/०३/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने चिंचवड गावामधील पालिकेच्या इमारतीमध्ये तलाठी कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन दिली आहे. परंतु हॉल मोठा असल्याने व तलाठी कार्यालयास एवढी जागा आवश्यक नसल्याने मध्ये पार्टीशियन टाकून ती जागा इतर कारणांसाठी दुस-या संस्थेस उपलब्ध करुन देता येईल म्हणून सदर हॉलमध्ये पार्टीशियन टाकणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ४३

विषय क्र. १४

दिनांक ०६/०३/२०१८

विभाग – पीएमपीएमएल / स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा.करुणा शेखर चिंचवडे

अनुमोदक: मा.प्रज्ञा महेश खानोलकर

संदर्भ :- मा.करुणा शेखर चिंचवडे यांचा दि. ६/३/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १७ मध्ये वाल्हेकरवाडी येथील चौकामध्ये बसथांबा बसविण्याची मागणी काही दिवसापुर्वी महानगरपालिकेच्या पी.एम.पी.एल. च्या बीआरटी विभागाकडे केली होती. मात्र निधी शिल्लक नसल्या कारणाने तो बसविता येणार नाही असे संबंधीत विभागाकडून सांगण्यात आले. तरी वाल्हेकरवाडी परिसरात बसने ये जा करणा-या नागरीकांची गैरसोय हाते. प्राशाना तेथे ताटकळत उभे राहवे लागत आहे. तरी वाल्हेकरवाडी चौक येथील बस थांबा त्वरीत बसविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.राजेंद्र तानाजी गावडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[राजेंद्र तानाजी गावडे ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/३७ /२०१८.
दिनांक :०२/०४/२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना